# आपल्या अधिकारांचे स्पष्टीकरण

जर आपल्याला **स्थानबद्ध केलेले नसेल** आणि संशयिताच्या स्वरूपात आपली चौकशी केली जाणार असेल.



## 1. मुलाखती दरम्यान वकीलासोबत गोपनीय सल्ला-मसलत करण्याचा व कायदेशीर मदतीचा हक्क

A. केव्हा?

- मुलाखतीपूर्वी वकीलासोबत गोपनीय सल्ला-मसलत करण्याचा व मुलाखतीदरम्यान कायदेशीर मदत घेण्याचा आपल्याला अधिकार आहे.
- ज्या गुन्ह्यांकरीता आपली चौकशी केली जात आहे ते जर अधिक कालावधीची तुरूंगवासाची शिक्षा देण्याजोगे असतील, यासाठी C. अंतर्गत ठरविलेली प्रक्रिया लागू होईल.

B. कोणता वकील?

- आपण आपल्या पसंतीच्या वकीलासोबत सल्ला-मसलत करण्यास मुक्त आहात.
- काही विशिष्ट कायदेशीर अटींखाली, आपण पूर्णपणे किंवा अंशत: शुल्क माफ असलेल्या कायदेविषयक सहाय्य यंत्रणेद्वारे वकीलांशी संपर्क साधू शकता. कायदेशीर मदतीकरीता असणाऱ्या अटी जाणून घेण्याकरीता आपण संबंधित फॉर्म मागू शकता. त्यानंतर आपल्याला बार असोसिएशनच्या कायदेविषयक सहाय्य कार्यालयाकडे वकीलांची नेमणूक करण्याची मागणी करता येईल.

C. गोपनीय सल्ला-मसलत कशी करता येईल?

जर आपण <u>लेखी आमंत्रण</u> पाठवलेले असेल, ज्यामध्ये 1 ते 4 पर्यंतच्या क्रमांकाखाली निर्दिष्ट अधिकारांची यादी दिलेली असेल आणि असे म्हटलेले असेल की आपण मुलाखतीपूर्वी वकीलांशी सल्ला-मसलत कराल असे गृहीत धरण्यात आले आहे:

- आपल्याला वकीलांशी सल्ला-मसलत करण्याची संधी आधीच उपलब्ध असल्याने तहकूबीची विनंती मंजूर केली जाणार नाही.
- जर आपण वकीलांची मदत न घेण्याचे ठरवले तर मुलाखती सुरू होण्यापूर्वी आपल्याला आपल्या मौन राहण्याच्या अधिकाराची माहिती दिली गेली पाहिजे. (पोइन्ट ३ पाहा).

जर आपण <u>लेखी आमंत्रण पाठवले नसेल</u> किंवा अपूर्ण लेखी आमंत्रण पाठवले असेल:

- आपण फक्त एकाच प्रसंगी मुलाखतीची तारीख अथवा वेळ पुढे ढकलण्याची मागणी करू शकता, जेणेकरून आपल्याला आपल्या वकीलाशी सल्ला-मसलत करणे शक्य होईल.
- आपण आपल्या वकीलाशी दूरध्वनीवर बोलण्याचा पर्याय स्विकारू शकता, त्यानंतर मुलाखतीस सुरवात केली जाईल.
- मुलाखतीचे ठिकाण मध्ये आपण आपल्या वकीलांच्या येण्याची वाट बघू शकता.

D. मुलाखतीदरम्यान कायदेशीर मदत

आपले वकील खालील बाबींची खात्री करतील:

- मौन राहण्याच्या आपल्या अधिकाराचे आणि गुन्ह्यात गोवले न जाण्याच्या अधिकाराचे पालन होत आहे,
- मुलाखतीदरम्यान आपल्याशी कसा व्यवहार होत आहे, आपल्यावर कसलाही अयोग्य दबाव तर आणला जात नाही आहे,
- आपले अधिकार आणि मुलाखतीची नियमितता आपल्यावर स्पष्ट करण्यात आली आहे.

जर आपल्या वकीलांना यापैकी कुठल्याही विषयावर टिप्पणी करायची असेल तर ते ती लगेच पोलिस मुलाखत निवेदनामध्ये नोंद करू शकतात. आपले वकील विशिष्ट विचारपूस करण्यास किंवा विशिष्ट व्यक्तीला मुलाखत

घेण्यास सांगू शकतात.ते विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांविषयी स्पष्टीकरण विचारू शकतात. ते तपास आणि मुलाखतीशी संबंधित आपले म्हणणे समोर मांडू शकतात. त्यांना आपल्याऐवजी उत्तर देण्याची किंवा मुलाखतीस अडथळा आणण्याची परवानगी नाही.

# आपल्या अधिकारांचे स्पष्टीकरण

जर आपल्याला **स्थानबद्ध केलेले नसेल** आणि संशयिताच्या स्वरूपात आपली चौकशी केली जाणार असेल.



E. हा अधिकार सोडून देणे?

वकीलाशी सल्ला-मसलत करण्याची विनंती करणे किंवा वकीलाची मदत घेणे आपल्यावर बंधनकारक नाही.

आपण स्वेच्छेने आणि गंभीरपणे विचार करून हा अधिकार सोडू शकता, जर आपण:

- वयाने सज्ञान असाल,
- आपण या अर्थाच्या दस्तऐवजावर स्वाक्षरी करून त्यावर दिनांक नमूद केला असेल.

## 2. गुन्ह्याचे संक्षिप्त संभाषण

- ज्या गुन्ह्यांकरीता आपली मुलाखत घेतली जात आहे त्याविषयी थोडक्यात सांगितले जाणे हा आपला अधिकार आहे.

## 3. मौन राहण्याचा अधिकार

- कुठल्याही परिस्थितीमध्ये स्वतःला गुन्ह्यात गोवून घेण्याकरीता आपल्यावर बळजबरी करता येणार नाही.
- आपण आपली ओळख सांगितल्यानंतर, आपण स्टेटमेंट देण्याचे, विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देण्याचे किंवा मौन राहण्याचे निवडू शकता.

## 4. मुलाखती दरम्यान अतिरिक्त अधिकार

मुलाखतीची सुरवातच ब-याच संभाषणांनी व्हायला हवी. गुन्ह्यांबाबत पुन्हा संक्षिप्त माहिती आणि मौन राहण्याच्या आपल्या अधिकाराची माहिती देण्यासोबतच आपल्याला खालील बाबी सुद्धा सांगण्यात येतील:

- आपण अशी विनंती करू शकता की जे काही प्रश्ने विचारले जातील आणि आपण दिलेली संपूर्ण उत्तरे आपल्याच शब्दांत जशीच्या तशी रेकॉर्ड केली जावी,
- आपण विशिष्ट विचारपूस करण्यास किंवा विशिष्ट व्यक्तीला मुलाखत घेण्यास सांगू शकता,
- न्यायालयामध्ये आपल्या स्टेटमेंटला पुराव्याच्या स्वरूपात वापरले जाते.
- आपल्याला अटक झालेली नाही आणि आपली इच्छा असेल तेव्हा निघून जाण्यास आपण मुक्त आहात.
- मुलाखतीदरम्यान, आपण आपल्या ताब्यातील दस्तऐवजांचा वापर करू शकता, जर यामुळे मुलाखत घेण्यास उशीर होत नसेल तर. आपण मुलाखतीदरम्यान किंवा त्यानंतर या कागदपत्रांना पोलिस मुलाखत निवेदनामध्ये जोडण्यास किंवा न्यायालयीन कचेरीमध्ये जमा करण्यास सांगू शकता.

## 5. मुलाखतीच्या शेवटी

मुलाखतीच्या शेवटी मुलाखतीचा मजकूर आपणास वाचायला दिला जाईल. तो आपल्याला वाचून दाखवण्यासही आपण सांगू शकता.

असे काही आहे जे आपल्याला बदलायचे आहे किंवा काही जोडायचे आहे का असेही आपल्याला विचारले जाईल.

## 6. दुभाषीची मदत

- जर कार्यवाहीच्या भाषेव्यतिरिक्त आपल्याला दुस-या भाषेमध्ये बोलायचे असल्यास मुलाखतीदरम्यान आपल्या मदतीसाठी एका अधिकृत दुभाषीला बोलवण्यात येईल. ही मदत मोफत आहे.
- आपल्याला आपल्या भाषेमध्ये स्वतःचे स्टेटमेंट लिहिण्यास सांगितले जाऊ शकते.

**आपल्या अधिकारांचे हे स्पष्टीकरण आपण आपल्याजवळ ठेऊ शकत**